N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** कुरुन्दवाड
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0357 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 08/08/2026 06:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिंनाक पासून):** 04/08/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 07/08/2026
**Time From (वेळेपासून):** 18:38 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:58 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 07/08/2026 **Time (वेळ):** 22:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 08/08/2026 05:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** कुरूंदवाड पोलीस ठाणे, कुरूंदवा, कुरूंदवाड ,शिरोळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): राजेंद्र अशोक सानप

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : अशोक सानप

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, कोल्,कोल्हापुर,करविर,लक्ष्मीपूरी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, कोल्,कोल्हापुर,करविर,लक्ष्मीपूरी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8208971207

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत. असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोष विश्वास साळुंखें | | वडील का नाम : विश्वास साळुंखे | 1. शिवराय कर्नर,,कबनूर , हातकणंगले,कुरुन्दवाड, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | फिरोज पापालाल्ल विजापूरे | | वडील का नाम : पापालाल विजापूरे | 1. हेरवाड ,शिरोळ,कुरुन्दवाड, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 3 | जमीर सलीम पठाण | | वडील का नाम : सलीम पठाण | 1. मजरेवाडी रस्ता, गोसावी गल्ली,, कुरुंदवाड,शिरोळ,कुरुन्दवाड, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पाचशे रुपये दराच्या 200 नोटा | 100,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

100,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनाक -08/08/2026
मी राजेंद्र अशोक सानप वय 40 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 8208971207समक्ष कुंरूदवाडपोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,
दिनाक 04/08/2026 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात हजर असताना मा.पोलीस उपअधीक्षक श्रीमती वैष्णवी पाटील यांनी आम्हाला समक्ष त्यांचे कक्षामध्ये बोलावून घेवून समक्ष हजर असले तक्रारदार नामे सय्यद बालेचांद पट्टेकरी रा.लोणार गल्ली, कुंरूदवाड ता.शिरोळ जि.कोल्हापूर मो नं 9763964040यांची ओळख करून देवून त्यांची कुरूंदवाड पोलीस ठाणे येथील पोलीस साळुंखे व खाजगी इसम फिरोज उर्फ समीर विजापुरे यांचे विरूध्द लाचे संबधी तक्रार आहे. तरी आपण सदर गोपनिय तक्रारीनुसार कारवाई करणेबाबत मुखशिल आदेश दिला.
त्यानंतर आम्ही तक्रारदार पट्टेकरी यांचे तक्रारीचे अनुषंगाने चौकशी केली असता त्यांनी त्यांचे विरूध्द कुरूदवाड पोलीस ठाणेस दाखल असलेल्या अर्जावरून सावकारीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी व मदत करण्यासाठी पोलीस साळूंखे व खाजगी इसम फिरोज उर्फ समीर विजापूरे हे 1,50,000 रू.लाचेची मागणी करत असल्याबाबतचा तक्रारी अर्ज आमचेकडे दिला. त्यानंतर आम्ही तक्रारदार पट्टेकरी यांना कुंरूदवाड गावचे अलीकडे असले कुरूंदवाड ते टाकळेवाडी रोडवर चक्रेश्वरी पेट्रोलपंपाचे पुढील बाजुस असले मोकळ्या जागेमध्ये हजर राहणेबाबत सांगून पुढे पाठविले.त्यानंतर आम्ही लागलीच तक्रारीवर कारवाई करणेसाठी आयुक्त,कोल्हापूर महानगरपालीका,कोल्हापूर यांना पत्र देवून दोन पंच उपलब्ध करून घेतले.त्यानंतर आम्ही,दोन शासकीय पंच व स्टाफ असे शासकीय न्यु बोलेरो गाडी नं.एमएच 09 जीयु 7591 या वाहनातून लाप्रवि कार्यालयातून रवाना झालो. प्रवासा दरम्यान आम्ही तक्रारदार यांचे संपर्कात राहून त्यांनाकुठे यायचे असे विचारलेवर त्यांनी चक्रेश्वरी पेट्रोलपंपाचे पुढील बाजूस असले मोकळ्या जागेमध्ये थांबलो आहे येथे येण्यास सांगितले.त्याप्रमाणे आम्ही सदर ठिकाणी येथे 16.25 वा.पोहचलो.तेथे तक्रारदार पट्टेकरी हजर होते.त्यावेळी मी तक्रारदार पट्टेकरी यांना स्टाफ, शासकीय पंच यांचेशी ओळख करून दिली. त्यावेळी आम्ही तक्रारदारपट्टेकरीयांना त्यांची तक्रार पंचासमक्ष सांगणेस सांगितलेवर त्यांनी थोडक्यात हकिकत सांगितली की,माझे ओळखीचे शब्बीर मुल्ला यांना काही दिवसापुर्वी मी हातउसने पैसे दिले होते.परंतु शब्बीर मुल्ला यांनी माझे विरूध्द मी सावकारी करत असलेबाबत खोटा अर्ज कुंरूदवाड पोलीस ठाणेस दिला आहे.त्याची चौकशी पोलीस हवालदार सांळूखे हे करत आहेत.त्यांनी मला पोलीस ठाणेत बोलावून घेवून माझेवर सावकारीचा गुन्हा दाखल न करणेसाठी व मदत करणेसाठी म्हणून 1,50,000 रू. मागणी केली असून साळूंखे साहेबांनी मागणी केलेले रक्कम माझे ओळखीचे फिरोज उर्फ समीर विजापूरे हा पैसे कधी देणार आहेस असे म्हणून ती रक्कम माझेकडे दे असे म्हणत आहेत.पोलीस सांळूखे व खाजगी इसम विजापुरे हे मागणी करत असलेले 1,50,000 रू. हे लाच म्हणून मागणी करत असल्याची माझी खात्री झाली असून माझी त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. अशी थोडक्यात हकीकत सांगितली.त्यानंतर तक्रारदार पट्टेकरी यांनी आमचेकडे दिलेला

तक्रारी अर्ज पंचाना वाचण्यास दिला.त्यावेळी तक्रारदार पट्टेकरी यांनी तोंडी सांगितलेली व लेखी दिलेली तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व दोन्ही पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या.

तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार पट्टेकरी व पंच नं.01 रसुल पाटीलयांचेसह खाजगी इसम फिरोज उर्फ समीर विजापूरेयांची भेट घेण्यास व त्यांना घेवून कुरूंदवाड पोलीस ठाणे येथे पोलीस साळूंखे यांची भेट घेण्यास पाठवून देवून ते तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सागुन, पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. तसेच शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये सॅनडिस्क कंपनीचे 8 जीबीचे नविन मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकॉर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार पट्टेकरीव पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर तक्रारदार पट्टेकरीव दोन्ही पंचाचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केली. त्यानंतर तक्रारदार पट्टेकरी यांनी आमचे सुचनेवरून फिरोज उर्फ समीर विजापूरे यांचे मोबाईल नं.9970726240 वर फोन करून कोठे भेटायचे विचारण्याकरीता फोन करण्यास सांगितला.त्यावेळी तक्रारदार यांनी फोन केला त्यावेळी फिरोजयाने तो बाजारात जाणार असून थोडया वेळाने फोन करतो असे सांगितले. त्यानंतर थोडया वेळाने पुन्हा फिरोज यांचे मोबाईलवर तक्रारदार पट्टेकरी यांनी फोन केला त्यावेळी त्याने अजुन बाजारामधून आलो नसल्याचे सांगितले. त्यानंतर थोडया वेळाने फिरोज याचा तक्रारदार यांचे मोबाईलवर मिसकॉल आला म्हणून तक्रारदार यांनी पुन्हा फोन केला त्यावेळी फिरोज याने तक्रारदार यांना कुरूंदवाड बस स्टॅन्डवर भेटण्यास सांगितले.त्यांचेमधील प्रत्येक फोनचे संभाषण ज्या त्यावेळी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत के ले.

त्यानंतर तक्रारदार व पंच यांना डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये एकूण 04 फाईल ध्वनीमुद्रीत झालेल्या असल्याचे दाखवून त्यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले.त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सुचना देवून व्हाईस रेकॉर्डर 18.38 वाजता चालु करून, तो तक्रारदार पट्टेकरीयांचे गळयात अडकवुन तक्रारदार पट्टेकरी व पंच नं.1पाटीलयांनाफिरोज उर्फ समीर विजापूरे यांची भेट घेवून त्यांचेसोबत पोलीस साळूंखे यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार यांचे हिरो प्लेजर एमएच 09 एफझेड 0718 यामोपेड वरूनकुरूंदवाड बस स्टॅन्डजवळ पाठविले. त्यांनतर ब-याच वेळाने तक्रारदार पट्टेकरी व पंच नं.1 पाटीलअसे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 21.12 वाजता बंद केला.त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 पाटील यांना फिरोज उर्फ समीर विजापूरे व पोलीस साळुंखे यांना भेटणेस गेलेवर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी तक्रारदारयांचे सोबत कुरूंदवाड बस स्टॅन्डजवळ गेलो त्यावेळी तेथे फिरोज उर्फ समीर विजापूरे यांना भेटलो त्यावेळी त्यं ाचेमध्ये चर्चा झाली त्यावेळी तक्रारदार यांनी, क्या क्या हुई थी साळुंखे साहब से बात असे विचारले त्यावर खाजगी इसम फिरोज याने मै उसे साळुंखे साहेब क्या होते,कुणाचा संबध नाही, उन्हे तुमना एक लाख रूपये बोला था ना असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी दिड , तब नहीं जम्या, फिर जम्या बोला ठिक हे ै कमी जास्त कर ते ा , संपायचे क्या ,तो मे हु कर के गया मे,तो कत्ते करता साहेब असे म्हणाले त्यावर फिरोज याने नही एक लाख बोल्या, एक लाख रूपये,तुमना बोले के क्या , एक लाख रूपये जमीरला आणि त्यांना सांगितलय, माझं एक लाख तुमचं तुम्ही बाहेरच बघा,मग तेवढं का होणार नाही साहेब,एक पन्नास तुम्ही घ्या असे म्हणाले त्यानंतर चर्चा सुरू असताना आणखी एक जमीर पठाण नावाचा खाजगी इसम तेथे आला,तोही तक्रारदार व फिरोज यांचे बरोबर तक्रारदार यांचे कामाचे संदर्भाने चर्चा करू लागले व त्यांचेमध्ये पोलीस साळुंखे यांचेकरीता देण्याच्या पैशाबाबत चर्चा सुरू असताना तक्रारदार पट्टेकरी यांनी एक मिनीटं , तेरी मेरी चर्चा, तु मुझे कते पर मिठाता बोलता, कते पर क्या चर्चा हुई थी असे म्हणाले त्यावर जमीर यांनी साहेब को 5,000/- रूपये देणे का? विषय संपाणे.का , ओ 1,00,000/- रूपये मागणे लगे लवडा तो मै क्या फाडू,तुम पंचीस हजार दो, आयु पट्टेकरी बुलाया तो, आयु पटेटेकरी बुलाने को तयार नहीं, तुझे बोलू समीर एक 15,000/- रूपये बराबर हैं 15,000/- रूपये साळुंखे को दे दो असे म्हणाले त्यानंतर.जमीर हे निघून गेले.त्यानंतर फिरोज व तक्रारदार पट्टेकरी यांचेमध्ये पैशांचे वरून पोलीस साळुंखे यांचेशी समक्ष भेटून बोलणेबाबत चर्चा झाली.त्यानंतर फिरोज यांनी त्यांचे मोबाईलवरून पोलीस साळूंखे यांना फोन लावून तक्रारदार पट्टेकरी यांचेशी बोलणे करून दिले त्यावेळी पोलीस साळूंखे यांनी वॅाटसअप कॉल करण्यास सांगितला परंतु रिचाज नसल्यामुळे ते थोडक्यात बोलले त्यावेळी फिरोज यांनी तुम्ही सांगितल्या प्रमाणे पेमेंट घेवून यायला लागलोय येतो की तिथं असे म्हणाले त्यावर पोलीस साळूंखे यांनी बर ठिक हाय असे म्हणून फोन बंद केला.त्यानंतर पुन्हा फिरोज व तक्रारदार यं ाचेमध्ये पैसे कमी करण्यावरून चर्चा झालेनंतर फिरोज याने पोलीस साळूंखे यांना देण्याकरीता पैसे घेवून येण्यास सांगितलेवर आम्ही परत आपण थांबलेल्या ठिकाणी आलो.अशी हकीकत सांगितली.त्यानंतर आम्ही तक्रारदार पट्टेकरी यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी पंच नं.01 पाटील यं ाचेप्रमाणेच एकमेळाची हकीकत सांगितली.

पडताळणी कारवाईमध्ये खाजगी इसम फिरोज उर्फ समीर विजापूरे यांनी स्वतःचे व पोलीस साळूंखे यांचे आर्थिक

फायदयाकरीता 1,00,000 रू.मागणी केलेचे तसेच दुसरे खाजगी इसम जमीर पठाण याने तक्रारदार यांना लाच देण्यासाठी प्रोत्साहन दिलेचे निष्पन्न झाले.परंतु पोलीस साळूंखे यांची पडताळणी करणे आवश्यक असल्याने तक्रारदार पट्टेकरी यांना पुन्हा फिरोज याचे मोबाईलवर फोन करून पैसे कमी करण्याबाबत उदया पोलीस साळूंखे यांना भेटून चर्चा करूया असे सांगितले.

त्यानंतर दुसरे दिवशी दि.05/08/2026 रोजी तक्रारदार पट्टेकरी यांनी पोलीस साळुंखे हे पोलीस ठाणेमध्ये येणार नाहीत.त्यामुळे दुसरे दिवशी दि.06/08/2026 रोजी कारवाई करणेसाठी कळविले.त्याप्रमाणे दि. 06/08/2026 रोजी तक्रारदार पट्टेकरी यांचे फोनवरून फिरोज यास फोन केला त्यावेळी त्यांनी तो इचलकरंजी येथे असून पोलीस साळूंखे हे बंदोबस्तात असल्याचे सांगितलेने तक्रारदार पट्टेकरी यांनी दि.07/08/2026 रोजी पुढील कारवाई करण्याची विंनती केली.

त्याप्रमाणे दि.07/08/2026 रोजी पडताळणी कारवाईचे आयोजन करून तक्रारदार पट्टेकरी यांना फोनवरून संपर्क करून माणगांवेवाडी जवळ हजर राहणेबाबत सुचना दिली.त्यानंतर तक्रारदार पट्टेकरी व पंच नं.01 पाटील यांना साळूंखे यांचे भेट घेण्याकरीता कुरूंदवाड पोलीस ठाणे येथे पाठविण्याचे ठरले.तत्पुर्वी तक्रारदार याचे मोबाईलवरून पोलीस साळूंखे यांचे मोबाईल नंबर 9921481595 यावर फोन केला असता सुरुवातीस त्यांनी उचलला नाही.त्यानंतर थोडया वेळाने पुन्हा साळूंखे यांना फोन केला त्यावेळी त्यांनी तक्रारदार.पट्टेकरी यांना पोलीस ठाणेत भेटण्यास बोलविले.त्यानंतर तक्रारदार पट्टेकरी व पंच नं.01 पाटील यांना यापुर्वी दिलेल्या सुचनांची उजळणी करून देवून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर 15.53 वा.सुरू करून तक्रारदार यांचे गळयात अडकवून तक्रारदार यंाचे मोपेडवरून कुरूंदवाड पोलीस ठाणे येथे भेट घेण्यास पाठविले.त्यानंतर थोडया वेळाने आंम्ही पडताळणी कारवाईस जातेवेळी दिले सुचनेप्रमाणे धरणगुत्ती फाटा,कुरूंदवाड ते नांदणी रोडवर तक्रारदार व पंच नं.01 आले.त्यावेळी तक्रारदार यांचे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर 17.38 वा.बंद केला. त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 पाटील यांना पोलीस साळूंखे यांना कुंरूदवाड पोलीस ठाणे येथे भेटणेस गेलेवर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार कुरूंदवाड पोलीस ठाणेमध्ये जावून पोलीस साळूंखे यांना भेटलो त्यावेळी तेथे फिरोज हजर होता.तो आंम्हाला घेवून पोलीस साळूंखे यांचेकडे घेवून गेला.त्यावेळी त्यांचेमध्ये पैशाचे अनुषंगाने बोलणे झाले.त्यावेळी तक्रारदार यांनी माझेवर गुन्हा होणार नाही, अर्ज काढून घेणार काय याबाबत चर्चा केली. त्यावेळी तक्रारदार यांनी काल फिरोज माझे कडं आलते, लाख रूपय दे म्हणते, साहेबने दिड लाख रूपये सांगितले म्हणते, साळुंखे साहब ने बरोबर हे क्या असे म्हणाले त्यावर पोलीस साळूंखे यांनी बरोबर असे म्हणाले त्यानंतर तक्रारदार पट्टेकरी यांनी काय करू ते सांगा असे पोलीस साळूंखे यांना विचारलेवर त्यांनी नाही ........... एक करा जावा की,असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी किती,एक लाख असे विचारलेवर साळूंखे यांनी हा असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार पट्टेकरी व साळूंूंखे यांचेमध्ये कामाचे अनुषंगाने व लाच रक्कमेच्या अनुषंगाने चर्चा झाली. त्यानंतर पोलीस साळूंखे यांनी सांगितलेप्रमाणे पैसे घेवून येतो असे तक्रारदार यांनी सांगितलेवर पोलीस साळूंखे यांनी लगेच या असे म्हणाले..त्यानंतर आंम्ही आपण सांगितलेल्या ठिकाणी परत आलो अशी हकीकत सांगितली. त्यानंतर आंम्ही तक्रारदार पट्टेकरी यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी पंच नं.01 पाटील यंाचेप्रमाणेच एकमेळाची हकीकत सांगितली.

पडताळणी कारवाईमध्ये पोलीस साळूंखे यांनी तक्रारदार पट्टेकरी यांचे विरूध्द दाखल असले सावकारी अर्जावरून त्यंाचेवर गुन्हा नोंद न करणेसाठी व मदत करणेसाठी म्हणून तक्रारदार यांचेकडे 1,00,000 रू.ची मागणी केल्याचेनिष्पन्न झालेने आम्ही लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई सुरू केली.

त्यानंतर मी तक्रारदार पट्टेकरीयांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचे मोपेडच्या डिकीमधील 500/- दराच्या 200 चलनी नोटा अशी 1,00,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार पट्टेकरी व पंचाना अॅथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अंॅथ्रासिन लावलेले 100,000/-रूपये तक्रारदारयांचे कॅरीबॅगमध्ये ठेवून कॅरीबॅगेचे वर अॅन्थ्रॉसिन पावडर लावून तक्रारदार यांचे जॅकेटच्या आतील बाजुच्या खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार पट्टेकरी दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या तसेच तक्रारदार पट्टेकरी यांना पोलीस साळूंखे किंवा खाजगी इसम फिरोज विजापूरे यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतरखिशातील हातरूमाल काढून चेह-यावरून फिरवून पुर्वनियोजीत इशारा करणेचा आहे असे सांगितले.सापळा कारवाईवेळीचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डवरमध्ये ध्वनीमुद्रीत करावयाचे असलेने पडताळणी कारवाईवेळीचे मेमरीकार्ड काढून सुरक्षिततरित्या आमचे ताबेत घेवून नविन सॅनडिस्क कंपनीचे 8 जीबीचे मेमरीकार्ड घालून त्यामध्ये यापुर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याचे तक्रारदार व पंचाची खात्री करून दिली. तसेच तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक यांना योग्य त्या सुचना दिल्या.त्यावेळी तक्रारदार

पट्टेकरी यांनी साळूखे यांना फोन करून लाच रक्कम घेवून कोठे येवू याबाबत विचारणेकरीता साळूंखे यांचे मोबाईलवर फोन केला त्यावेळी साळूखे यांनी पोलीस स्टेशनला ये असे सांगितले.तो कॉल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत केला.त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर 19.17 सुरू करूनतक्रारदार पट्टेकरी यांचे गळयामध्येअडकवून यांना लाच रक्कम घेवून पंच नं.01 पाटील यांचे सोबत कुरूंदवाड पोलीस ठाणेस तक्रारदार पट्टेकरी यांचे मोपेडवरून पाठविले.त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं.02 ढालेअसे आमचेकडील शासकीय न्यु बोलेरो वाहनाने तक्रारदार यांचे मोपेडचे पाठोपाठ कुरूंदवाड पोलीस ठाणेचे अलीकडे थोडया अंतरावरगाडी लावून थांबलो. त्यावेळी तक्रारदार पट्टेकरी व पंच असे पोलीस ठाणेमध्ये गेले.व लगेच थोडया वेळाने बाहेर आले व मोपेडवरून कुरूंदवाड बस स्टॅन्डच्या दिशेने निघालेने आंम्हीही त्यांचे पाठोपाठ कुरूंदवाड बस स्थानकाजवळ अलीकडे थांबवून पायी चालत बस स्थानकाचे आवारामध्ये कोणास संशय येणार नाही अशा रितीने थांबलो.त्यावेळी तक्रारदार पट्टेकरी हे स्टॅन्डचे गेटजवळ असताना त्यांचे जवळ एक मोटरसायकलवरून पोलीस साळूंखे आला व त्याने पट्टेकरी यांचेकडून लाच रक्कम असलेली पिशवी घेवून मोटर सायकल सुरु करून निघून जावू लागला त्यावेळी आंम्ही आमचे वाहनात बसून त्याचा पाठलाग केला त्यावेळी थोडे अंतर गेलेनंतर घोरी कॉलनी परिसरामध्ये मोकळया प्लॉटमध्ये मोटरसायकल सोडुन पळत पुढे जावून मोकळया प्लॉटमध्ये पैशांची पिशवी टाकून पळून जात असताना त्याना पकडण्यात आले.त्यांना आमची ओळख सांगून त्यांना ताबेत घेवून आंम्ही तक्रारदार पट्टेकरी यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर 19.58 वाजता बंद केला. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या अल्ट्रा व्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात केल्या त्यामध्ये पोलीस हवालदार साळूंखे यांचे उजव्या हाताला अॅन्थ्रासिन पावडरची हिरवट चकाकी दिसून आली..व लाच रक्कम पिशवीसह ताबेत घेतली.सदर घटनेचे माझे सुचनेवरून पोकॉ रविंद्र पाटीलयांनी मोबाईलवर व्हिडीओ शुटिंग केले.त्यानंतर आंम्ही पंच नं.01 पाटील यांना तुम्ही व तक्रारदार असे पोलीस साळूंखे यांना लाच रक्कम देण्यासाठी आला त्यावेळी काय घडले असे विचारले त्यावेळी त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे त्यांचे मोपेडवरून कुरूंदवाड पोलीस ठाणे येथे आलो त्यावेळी पोलीस साळूंखे हे तेथे नव्हते. म्हणून त्यांचे मोबाईलवर तक्रारदार यांनी फोन केला त्यावेळी पोलीस साळूंखे यांनी कुरूंदवाड बस स्टॅन्डवर येण्यास सांगितलेने आंम्ही बस स्थानकामध्ये गेलो.त्यावेळी तेथे पोलीस साळूखे आले.त्यावेळी तक्रारदार त्यांचेशी चर्चा करत करत हं .. 1,00,000/- रूपये आता तुम्हाला देणार असे म्हणाले त्यावर साळूंखे हा असे म्हणाले व त्यानंतर तक्रारदार यांनी लाच रक्कम असलेली पिशवी पुढे करून हे पैसे मोजून घ्या पहिल ,असे म्हणालेवर साळूंखे यांनी मोजायची गरज नाही असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी नको नको काढा असे म्हणाले त्यावर साळूंखे यांनी तुम्ही मोजलाय काय ,मोजायची गरज नाही तुम्ही मोजलय नाअसे म्हणाले व त्यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम स्विकारली त्यावेळी तक्रारदार यांनी पुर्वनियोजित इशारा केला तेवढयात साळूंखे मोटरसायकलवरून निघून गेले त्यावेळी आपण व पंच नं.02 व सापळा पथक असे तेथे आला व साळूखे यांचा पाठलाग करून त्यांना पकडले अशी हकीकत सांगितली.

त्यानंतर खाजगी इसम फिरोज उर्फ समीर विजापूरे व जमीर पठाण यांना कुरूंदवाड येथून ताबेत घेवून पुढील सर्व कार्यवाही कुरूंदवाड पोलीस ठाणे येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी यातील मुळ तक्रारदारसय्यद पट्टेकरी यांचे विरूध्द सावकारी करत असलेबाबत दिलेल्या तक्रारी अर्जावरून गुन्हा दाखल न करणेसाठी व अर्जमध्ये मदत करणेसाठी संतोष विश्वास साळुंखे वय 43 वर्षे व्यवसाय नोकरी पद पोहेकॉ 2394 नेमणुक कुरूंदवाड पोलीस ठाणे रा.शिवराय कॉर्नर,कबनूर ता.हातकणंगले यांनी स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तसेच खाजगी इसम फिरोज पापालाल विजापूरे वय 40 वर्षे रा.हेरवाड ता.शिरोळ जि.कोल्हापूर यांनी त्यांचे व साळूंखे यांचे आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार यांचेकडे 1,50,000 रू.लाचेची मागणी करून तडजोडीअंती 1,00,000 रू. लाचेची मागणी करून पोलीस हवालदार संतोष साळूंखे यांनी बेकायदेशीरपणे व अप्रामाणिकपणे तक्रारदार यांचेकडून 1,00,000 रू. स्विकारले.तसेच खाजगी इसम जमीर सलीम पठाण वय 41 वर्षे रा.मजरेवाडी रस्ता, गोसावी गल्ली,कुरूंदवाड ता.शिरोळ जि.कोल्हापूर यांनी तक्रारदार पट्टेकरी यांना लाच देण्यास प्रोत्साहन दिलेचे निष्पन्न झालेने माझी 1) संतोष विश्वास साळुंखे वय 43 वर्षे व्यवसाय नोकरी पद पोहेकॉ 2394 नेमणुक कुरूंदवाड पोलीस ठाणे रा.शिवराय कॉर्नर,कबनूर ता.हातकणंगले खाजगी इसम 2) फिरोज पापालाल विजापूरे वय 40 वर्षे रा.हेरवाड ता.शिरोळ जि.कोल्हापूर 3) जमीर सलीम पठाण वय 41 वर्षे रा.मजरेवाडी रस्ता, गोसावी गल्ली,कुरूंदवाड ता.शिरोळ जि.कोल्हापूर यांचेविरूध्द माझी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7, 7 अ, 12 प्रमाणे फिंयाद आहे.

माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANTOSH MAHADEV MANE(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):'

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

पोलीस ठाणे अंमलदार
कुरूदवाड पोलीस ठाणे

**Registered by** (नोंदणी अधिकारी)
**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** SANTOSH MAHADEV
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):